महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ३०/०९/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण.२०२४/प्र.क्र.९६/विचौ-१ दि.२७ सप्टेंबर २०२४

**विषय :-** विभागीय चौकशी/ शिस्तभंगविषयक कारवाईचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्याच्या कार्यपध्दतीबाबत

******

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२४/प्र.क्र.९६/विचौ-१, दि.२३ सप्टेंबर २०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संगणक सांकेतांक २०२४०९२३१७१८२३२४१२००७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके / आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशासन/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई. नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.



Scanned with CamScanner

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह) पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.1 ते 19
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, १ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. 2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**विभागीय चौकशी / शिस्तभंगविषयक कारवाईचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्याच्या कार्यपद्धतीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०२४/ प्र.क्र.९३/ विचौ-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २७ सप्टेंबर, २०२४

**शासन परिपत्रक :-**

शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या शिस्तभंगविषयक कारवाईची प्रकरणे अभिप्रायार्थ / सहमतीसाठी या विभागास अन्य प्रशासकीय विभागांकडून प्राप्त होतात. असे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर विभागीय चौकशीच्या अनुषंगाने सर्व टप्पे अनुसरले आहेत किंवा कसे, विहित कार्यपध्दतीनुसार प्रकरण हाताळण्यात आले आहे किवा कसे याबाबत छाननी करुन त्यावर सामान्य प्रशासन विभागाकडून नियमानुसार अभिप्राय देण्यात येतात.

प्राप्त झालेल्या प्रस्तावांमध्ये गैरवर्तणूकीचा तपशील, अपचाऱ्याचा सेवा तपशील, दोषारोपपत्रे, चौकशी अहवाल, अहवालावरील चौकशी अधिकाऱ्यांचे व विभागाचे निष्कर्ष इ. बाबी सुसुत्रितपणे नसल्यास तसेच काही तपशीलासंदर्भातील संबंधित कागदपत्रे प्रस्तावासोबत उपलब्ध करुन देण्यात येत नसल्यास परिणामी, संपूर्ण व सुस्पष्ट तपशीलाअभावी प्रस्तावांची तपासणी करुन त्यावर सुस्पष्ट अभिप्राय देण्यास सामान्य प्रशासन विभागास अडचणी निर्माण होतात. तसेच विभागांकडे अपूर्ण माहितीसाठी पाठपुरावा करण्यात वेळ जातो. या सर्व बाबींमुळे प्राप्त प्रस्तावांवर अभिप्राय देण्यास विलंब लागतो.

२. विभागांकडून सामान्य प्रशासन विभागास सहमती / अभिप्रायार्थ सादर होणाऱ्या प्रस्तावांमध्ये शिस्तभंगविषयक प्रकरणांचा तपशील व अपचाऱ्याचा तपशील विहीत नमुन्यामध्ये सादर झाल्यास अशा प्रस्तावांवर सामान्य प्रशासन विभागामार्फत त्वरेने कार्यवाही करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे विभागांनाही प्रस्ताव सादर करताना सोयीचे ठरेल. विभागीय चौकशीचे प्रकरण हाताळताना एखादा टप्पा राहीला असल्यास टिप्पणी सादर करताना लक्षात येवून विभागस्तरावरच त्याचे निराकरण करता येईल.

यासाठी सामान्य प्रशासन विभागास प्राप्त होणाऱ्या शिस्तभंगविषयक कारवाईच्या प्रकरणासंदर्भात टिप्पण्यांचे प्रारुप नमुने तयार करण्यात आले असून सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना कळविण्यात येत आहे की, विभागांकडून प्राप्त होण्याऱ्या दोषारोप प्रस्ताव, शिक्षा प्रस्ताव व अपचाऱ्याच्या अंतिम शिक्षेचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवावयाच्या पत्राचे प्रारुप सादर करताना प्रस्ताव या परिपत्रकासोबत जोडलेल्या टिप्पणीच्या नमुन्यांमध्ये सादर करण्यात यावेत.

**१) दोषारोप ज्ञापनांस मान्यतेचा प्रस्ताव — नमुना-अ**

**२) शिक्षेच्या सहमतीचा प्रस्ताव —नमुना-ब**

**३) शिक्षेच्या अनुषंगाने म.लो.आयोगाकडे पत्रव्यवहाराच्या प्रारुपास सहमती देण्याचा प्रस्ताव — नमुना-क**

३. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरीलप्रमाणे टिप्पणीच्या नमुन्यात प्रस्ताव सादर करावा. प्रस्ताव ई-ऑफीसद्वारे सादर केला असेल तरीही वरीलप्रमाणे टिप्पणीच्या नमून्यात सादर करुन योग्य त्या ठिकाणी संबंधित कागदपत्रांची हायपरलिंक उपलब्ध करुन देण्यात यावी.

**४. उपरोक्त कार्यपध्दती दि. १४ ऑक्टोबर,२०२४ पासून अनिवार्य करण्यात येत आहे. सदर दिनांकानंतर वरीलप्रमाणे टिप्पणीच्या नमुन्या नसलेले प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाहीत.**

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२४०९२७१८२३४१२००७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT SAJANIKAR

Digitally signed by PRASHANT SAJANIKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=471c7cbe63d119adc5855a3c23ed95de986c1c7bc41d6f6cdd3767b3ebe74c82, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=217003E42C820EC29C89162937F98929453CC6295B34F71EA285041053A66AA7, cn=PRASHANT SAJANIKAR
Date: 2024.09.27 18:25:12 +05'30'

**( प्रशांत साजणीकर )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

सचिव/ प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई — त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक त्यांचे विभागातील विभागीय चौकशी विषय हाताळणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

निवडनस्ती विचौ.-१

शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०२४/ प्र.क्र.९३/ विचौ-१, दि.२७.०९.२०२४ सोबतचे सहपत्र

**नमुना-अ**

**दोषारोप ज्ञापनास सहमतीकरिता टिप्पणीचे प्रारुप.**

**विभाग / कार्यासन**

**विषय :- श्री./श्रीम. .........., पदनाम व इतर** *(एकापेक्षा अधिक असल्यास)* **यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाईच्या अनुषंगाने दोषारोप ज्ञापनास सहमती.**

............................ यांच्या दि................. च्या अहवालाच्या अनुषंगाने सादर.

२. **प्रकरणाची पार्श्वभूमी -** *(प्रकरणाची पार्श्वभूमी थोडक्यात नमूद करावी. यामध्ये प्रामुख्याने खालील अ, ब, क या मुद्यांचा उहापोह करावा. प्रकरणपरत्वे यामध्ये विभागास बदल करता येईल. तथापि, खालील नमूद बाबींचा टिप्पणीमध्ये समावेश असणे आवश्यक आहे. )*

अ) *(अधिकाऱ्याविरुद्ध अनियमिततेची बाब कशा पद्धतीने (तक्रार, लेखापरिक्षण, विधिमंडळ कामकाज, न्यायालयीन / लाचलुचपत प्रकरण, वर्तमानपत्र/सोशल मिडियातील बातमी) व कोणत्या कालावधीत उघडकीस आली, याचा तपशिल.)*

ब) *(अनियमिततेच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशीतील मुद्दे व त्यावरील विभागाचे मत थोडक्यात नमूद करावे.)*

क) *(प्रकरणाशी संबंधित इतर अनुषंगिक बाबी असल्यास त्या नमूद कराव्यात.)*

३. **ज्या नियमाखाली शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे त्यासंदर्भात विभागाचे समर्थन —**

*(टिप - (१) शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करताना शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम १० किंवा नियम ८ यापैकी कोणत्या नियमान्वये शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करावी याबाबत अत्यंत जबाबदारीने व जाणीवपूर्वक निर्णय घेणे अपेक्षित आहे. उदा.बऱ्याच प्रकरणांत नियम ८ अन्वये शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करुन दोषारोप मागे घेणे किंवा किरकोळ शिक्षा प्रस्तावित करणे असे प्रसंग उद्भवतात. या टप्प्यावर योग्य छाननी / प्राथमिक चौकशी झाल्यास शिस्तभंगविषयक कारवाईअंती निर्माण होणारी गुंतागुंत तसेच वेळेचा अपव्यय टाळता येईल. यामुळे सदर परिच्छेदामध्ये विभागाने ज्या नियमाखाली कारवाई प्रस्तावित आहे, त्याचे ठोस व विचारपूर्वक समर्थन करणे आवश्यक आहे.*

*(२) शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव सादर करताना प्रस्तावात सेवानिवृत्त अधिकाऱ्याचा समावेश असल्यास अशा अधिकाऱ्याच्या बाबतीत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियम २७ (२) (ब) (दोन) नुसार अशी कारवाई सुरु करण्यापूर्वीच्या चारपेक्षा अधिक वर्षांच्या कालावधीत घडलेल्या घटनेसंबंधातील ती असता कामा नये, ही बाब तपासून त्याप्रमाणे प्रस्तावामध्ये नमूद करणे आवश्यक आहे.)*

४. **शिस्तभंगविषयक प्राधिकारी -** प्रस्तुत प्रकरणातील श्री. ............. , पदनाम हे गट- संवर्गातील शासकीय कर्मचारी असून त्यांचे ग्रेड वेतन रु................/- असे आहे. सदर वेतनश्रेणीतील शासकीय कर्मचाऱ्यांकरिता शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.मुख्यमंत्री / मा.मंत्री / मा.राज्यमंत्री / विभागाचे सचिव / विभागप्रमुख हे आहेत. त्यामुळे श्री. ......... यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीची कारवाई सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावास मा.मुख्यमंत्री / मा.मंत्री / मा.राज्यमंत्री / विभागाचे सचिव / विभागप्रमुख यांची सहमती घेण्याची आवश्यकता आहे.

५. **सामान्य प्रशासन विभागाची सहमती आवश्यक असलेली प्रकरणे -** गट-अ संवर्गातील रु.७६००/- ही वेतनश्रेणी असलेल्या व त्यावरील वेतनश्रेणी असलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करताना तसेच शिक्षा प्रस्ताव अंतिम करतानाची प्रकरणे सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावीत, अशी तरतूद सा.प्र.वि. शासन परिपत्रक दि.०४.०३.२०१७ विहीत करण्यात आली आहे. श्री................. यांचे ग्रेड वेतन रु.............. असल्याने प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीकरीता सादर करणे आवश्यक आहे / आवश्यक नाही.

६. **विभागाचा प्रस्ताव -**

**अ) शासकीय कर्मचाऱ्यांची माहिती**

| अ.क्र. | शासकीय कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार) | कार्यालय | सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | नाव - | | | |
| | पदनाम— (घटनेच्या वेळी) | वेतनश्रेणी — (घटनेच्या वेळी) | कार्यालय — (घटनेच्या वेळी) | |
| | पदनाम- (सध्याचे) | वेतनश्रेणी — (सध्याची) | कार्यालय — (सध्याचे) | |
| २. | नाव - | | | |
| | पदनाम— (घटनेच्या वेळी) | वेतनश्रेणी — (घटनेच्या वेळी) | कार्यालय — (घटनेच्या वेळी) | |
| | पदनाम- (सध्याचे) | वेतनश्रेणी — (सध्याची) | कार्यालय — (सध्याचे) | |

**ब) जोडपत्र-एक मधील दोषारोपाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत :-**

| शासकीय कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | सेवानिवृत्तीचा दिनांक | दोषारोप बाब क्रमांक | दोषारोपाची बाब | दोषारोपाच्या बाबीच्या पुष्ट्यर्थ कागदपत्रांचे विवरण | दोषारोपाच्या पुष्ट्यर्थ साक्षीदार |
|---|---|---|---|---|---|
| श्री. ......... | | १) | दोषारोपाची संक्षिप्त बाब - ......................................... *(टिप - विभागाच्या ज्या नियमांचा भंग केला त्या नियमांचा तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या ज्या नियमांचा भंग केला ते नियम विनिर्दिष्टपणे नमूद करावेत.* | १) पृ....../प.वि. २) पृ....../प.वि. | १) २) ३) टिप — दोषारोप |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | *उदा. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम ३ चा भंग झाला असल्यास संबंधित नियम ३ (१) (एक), नियम ३ (१) (सहा)... याप्रमाणे नमूद करावे.* | ३) पृ....../प.वि.<br><br>दोषारोप क्र.१ च्या पुष्ट्यर्थ | क्र.१ च्या पुष्ट्यर्थ साक्षीदारांची नावे. |
| | | २) | दोषारोपाची संक्षिप्त बाब - ..........................................<br>*(टिप - विभागाच्या ज्या नियमांचा भंग केला त्या नियमांचा तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या ज्या नियमांचा भंग केला ते नियम विनिर्दिष्टपणे नमूद करावेत. उदा. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम ३ चा भंग झाला असल्यास संबंधित नियम ३ (१) (एक), नियम ३ (१) (सहा)... याप्रमाणे नमूद करावे.* | १) पृ....../प.वि.<br><br>२) पृ....../प.वि.<br><br>३) पृ....../प.वि.<br><br>दोषारोप क्र.२ च्या पुष्ट्यर्थ | १)<br>२)<br>३)<br><br>टिप – दोषारोप क्र.२ च्या पुष्ट्यर्थ साक्षीदारांची नावे. |
| श्री. .......... | | १) | | | |
| | | २) | | | |
| | | ३) | | | |

*(टिप - वरील तक्त्यात माहिती भरताना जोडपत्र-एक मधील दोषारोपाच्या बाबी केवळ कॉपी/पेस्ट न करता अनियमिततेची प्रमुख बाब संक्षिप्तपणे नमूद करावी. व विभागाने त्या बाबीच्या पुष्ट्यर्थ जोडपत्रासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी व साक्षीदारांची नावे नमूद करावीत.)*

७. वरील पार्श्वभूमीच्या अनुषंगाने उपरोक्त शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम १० / नियम ८ अन्वये शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्याकरीता दोषारोप ज्ञापन व जोडपत्र-एक ते जोडपत्र-चार (पृ. ...... / प.वि. ते पृ. ........../ प.वि.) सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीकरिता / शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांच्या मान्यतेकरिता सादर करण्यात येत आहेत.

**क.अ. / अ.स.**

**उ.स. / स.स.**

**सचिव / प्र.स. / अ.मु.स.**

**अ.मु.स. (सेवा) (सा.प्र.वि.)**

**********

*टिप - दोषारोप ज्ञापनाचे प्रारुप सादर करताना ज्या शासकीय कर्मचाऱ्यांचे ग्रेड वेतन ७६००/- व अधिक असेल अशा शासकीय कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेसाठी सादर करावेत. अन्य प्रकरणी प्रस्ताव थेट शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याकडे सादर करण्यात यावेत.*

**नमुना —ब**

**रु.७६००/- व त्यावरील ग्रेड वेतन घेणाऱ्या अधिकाऱ्यांच्या शिक्षेचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्याबाबतच्या टिप्पणीचा प्रारूप मसूदा**

---

**विभागाचे नांव :- ...... विभाग/ कार्यासन.....**

**DE MODULE NO.**

**विषय : विभागीय चौकशी प्रकरणी शिक्षेचा प्रस्ताव**

**१. प्रकरणाची पार्श्वभूमी :-** *(प्रकरणाची पार्श्वभूमी थोडक्यात नमूद करावी. यामध्ये प्रामुख्याने खालील अ, ब, क या मुद्यांचा उहापोह करावा. प्रकरणपरत्वे यामध्ये विभागास बदल करता येईल. तथापि, खालील नमूद बाबींचा टिप्पणीमध्ये समावेश असणे आवश्यक आहे. )*

*अ) (अधिकाऱ्याविरुद्ध अनियमिततेची बाब कशा पद्धतीने (तक्रार, लेखापरिक्षण, विधिमंडळ कामकाज, न्यायालयीन / लाचलुचपत प्रकरण, वर्तमानपत्र/सोशल मिडियातील बातमी) व कोणत्या कालावधीत उघडकीस आली, याचा तपशिल.)*

*ब) अनियमिततेच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशीतील मुद्दे व त्यावरील विभागाचे मत थोडक्यात नमूद करावे.*

*क) प्रकरणाशी संबंधित इतर अनुषंगिक बाबी असल्यास त्या नमूद कराव्यात.*

**२. विभागीय चौकशीचा तपशिल :-**

| **अ.क्र.** | **अपचारीनिहाय तपशिल** | **अपचाऱ्याचे नाव श्री.** | **अपचारी २ श्री.** | **अपचारी ३ श्री.** | |
|---|---|---|---|---|---|
| १. | दोषारोप ज्ञापनास सामान्य प्रशासन विभागाची सहमती घेतली आहे किंवा कसे | पृ. ....... /टि.वि. | | | |
| २. | दोषारोपाच्या ज्ञापनाचा दिनांक | दि.<br>पृ.क्र. | दि.<br>पृ.क्र. | दि.<br>पृ.क्र. | |
| ३. | सेवानिवृत्त अपचाऱ्यांच्या बाबतीत ज्ञापनाच्या दिनांकास घटनेचा कालावधी ४ वर्षांच्या आतील आहे किंवा कसे? म.ना.से. (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियम २७ अन्वये | होय / नाही. | होय / नाही. | होय / नाही. | |
| ४. | दोषारोप ज्ञापनावरील अपचाऱ्याचे अभिवेदन प्राप्त झाल्याचा दिनांक | | | | पृष्ठ क्रमांक |
| ५. | सचिव व सादरकर्ता अधिकारी-२ यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केल्याचा दिनांक | | | | पृष्ठ क्रमांक |
| ६. | चौकशी अहवाल प्राप्त दिनांक | | | | पृष्ठ क्रमांक |
| ७. | चौकशी अहवालातील निष्कर्ष *(दोषारोपनिहाय सिध्द/अंशत: सिध्द/सिध्द होत नाही, हे नमूद करावे)* | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | पृष्ठ क्रमांक |
| ८. | चौकशी अहवालातील निष्कर्षांस शिस्तभंग प्राधिकाऱ्याची सहमती/ असहमती *(दोषारोपनिहाय सहमत/ असहमत, हे नमूद करावे)* | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | पृष्ठ क्रमांक |
| ९. | चौकशी अहवाल अपचाऱ्याला बजाविल्याचा दिनांक *(सहमती/ असहमतीच्या कारणांसह)* | | | | पृष्ठ क्रमांक |
| १० | (अ) चौकशी अहवालावरील अपचाऱ्याच्या अभिवेदनाचा दिनांक | | | | पृष्ठ क्रमांक |
| | (ब) चौकशी अहवालावरील बाबनिहाय निष्कर्ष अपचाऱ्याने मान्य केले किंवा कसे | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | पृष्ठ क्रमांक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११. | अपचाऱ्याचे अभिवेदन शिस्तभंग प्राधिकाऱ्याकडून मान्य/अमान्य | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | पृष्ठ क्रमांक |
| १२. | प्रस्तावित शिक्षा | अपचारी क्र.१ - .............................<br>अपचारी क्र.२ - .............................<br>अपचारी क्र.३ - ............................. | | | |
| १३. | प्रस्तावित शिक्षेस शासनमान्यता मिळाल्यास अंमलबजावणीकरीता सेवा कालावधी शिल्लक आहे किंवा कसे | | | | |

**३. उक्त गैरवर्तणुकीसाठी फौजदारी / न्यायालयीन प्रकरण असल्यास त्याबाबतचा तपशिल :-**

| **अपचाऱ्याचे नाव** | **गु.र.क्र. व दिनांक** | **थोडक्यात तपशिल** | **सद्यस्थिती तपासाधीन/ अभियोग दाखल करण्यास मंजूरी / दोषारोपपत्र दाखल/ न्यायालयात प्रलंबित / शिक्षा इ. बाबी नमूद कराव्यात)** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**४.** वरील पार्श्वभूमीच्या अनुषंगाने श्री. ......................, पदनाम , श्री. ............................. पदनाम व श्री. .................. पदनाम यांच्या ................................................................ या शिक्षेच्या प्रस्तावास सहमती देण्याची विनंती सामान्य प्रशासन विभागास करण्यात येत आहे.

**क.अ. / अ.स.**

**उ.स. /स.स.**

**सचिव / प्र.स. / अ.मु.स.**

**अ.मु.स.(सेवा) (सा.प्र.वि.)**

***********

**नमुना –क**

**विभागीय चौकशी प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठवावच्या पत्राचे प्रारुप सामान्य प्रशासन विभागास सादर करण्याबाबतच्या टिप्पणीचा प्रारूप मसूदा**

---

**विभागाचे नांव :- ...... विभाग/ कार्यासन.....**
**DE MODULE NO.**

**विषय : विभागीय चौकशी प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठवावयाच्या पत्राच्या प्रारुपास सहमती देण्याचा प्रस्ताव**

**१. प्रकरणाची थोडक्यात पार्श्वभूमी :-**

(अ) प्रकरणाची थोडक्यात पार्श्वभूमी

(ब) दोषारोपाच्या बाबी (अपचारीनिहाय)

(क) चौकशी अहवालावरील निष्कर्ष व त्यावरील विभागाचे अभिप्राय (सहमती / असहमतीच्या कारणांसह)

(ड) वरील पार्श्वभूमीच्या अनुषंगाने कार्यरत अपचाऱ्याच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने अंतिम शिक्षा तर सेवानिवृत्त अपचाऱ्यांच्या बाबतीत अंतरिम शिक्षा नमूद करावी.

**२. विभागीय चौकशीचा तपशिल :-**

| **अ.क्र.** | **अपचारीनिहाय तपशिल** | **अपचाऱ्याचे नाव व पदनाम** | **अपचारी २** | **अपचारी ३** | |
|---|---|---|---|---|---|
| १ | ज्ञापनाचा दिनांक | दि.<br>पृ.क्र. | दि.<br>पृ.क्र. | दि.<br>पृ.क्र. | |
| २ | सेवानिवृत्त अपचाऱ्यांच्या बाबतीत ज्ञापनाच्या दिनांकास घटनेचा कालावधी ४ वर्षांच्या आतील आहे किंवा कसे? म.ना.से. (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियम २७ अन्वये | होय / नाही. | होय / नाही. | होय / नाही. | |
| ३ | दोषारोप ज्ञापनावरील अपचाऱ्याचे अभिवेदन प्राप्त झाल्याचा दिनांक | | | | पृष्ठ क्रमांक |
| ४ | चौकशी अधिकारी नियुक्त केल्याचा दिनांक | | | | पृष्ठ क्रमांक |
| ५ | चौकशी अहवाल प्राप्त दिनांक | | | | पृष्ठ क्रमांक |
| ६ | चौकशी अहवालातील निष्कर्ष *(दोषारोपनिहाय सिध्द/अंशतः सिध्द/सिध्द होत नाही, हे नमूद करावे)* | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | पृष्ठ क्रमांक |
| ७ | चौकशी अहवालावरील निष्कर्षांशी शिस्तभंग प्राधिकाऱ्याची सहमती/ असहमती *(दोषारोपनिहाय सहमत/असहमत, हे नमूद करावे)* | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | पृष्ठ क्रमांक |
| ८ | चौकशी अहवाल अपचाऱ्याला बजाविल्याचा दिनांक *(सहमती/ असहमतीच्या कारणांसह)* | | | | पृष्ठ क्रमांक |
| ९ | (अ) चौकशी अहवालावरील अपचाऱ्याच्या अभिवेदनाचा दिनांक | | | | पृष्ठ क्रमांक |
| | (ब) चौकशी अहवालावरील बाबनिहाय निष्कर्ष अपचाऱ्याने मान्य केले किंवा कसे | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | पृष्ठ क्रमांक |
| १० | अपचाऱ्याच्या अभिवेदन शिस्तभंग प्राधिकाऱ्याकडून मान्य/अमान्य | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | बाब क्र.१<br>बाब क्र.२<br>बाब क्र.३ | पृष्ठ क्रमांक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | सेवारत अपचाऱ्याच्या बाबतीत शिक्षेस शासनमान्यता | दि.<br>पृ.क्र.<br>/टि.वि. | | | |
| १२ | **सेवानिवृत्त अपचाऱ्यांच्या बाबतीत खालील माहिती सादर करावी.** | | | | |
| १२.१ | सेवानिवृत्त अपचाऱ्याच्या बाबतीत अंतरिम शिक्षेस शासनमान्यता | दि.<br>पृ.क्र.<br>/टि.वि. | | | |
| १२.२ | सेवानिवृत्त अपचाऱ्याच्या बाबतीत अंतरिम शिक्षेच्या अनुषंगाने दुसरी कारणे दाखवा नोटीस | दि.<br>पृ.क्र.<br>/प.वि. | | | |
| १२.३ | दुसरी कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने अपचाऱ्याचे निवेदन | दि.<br>पृ.क्र.<br>/प.वि. | | | |
| १२.४ | सेवानिवृत्त अपचाऱ्याच्या अंतिम शिक्षेस शासनमान्यता | दि.<br>पृ.क्र.<br>/टि.वि. | | | |

**२ अ) याच गैरवर्तणुकीसाठी फौजदारी / न्यायालयीन प्रकरण असल्यास त्याबाबतचा तपशिल :-**

| **अपचाऱ्याचे नाव** | **गु.र.क्र. व दिनांक** | **थोडक्यात तपशिल** | **सद्यस्थिती तपासाधीन/ अभियोग दाखल करण्यास मंजूरी / दोषारोपपत्र दाखल/ न्यायालयात प्रलंबित / शिक्षा इ. बाबी नमूद कराव्यात)** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**३. विभागाच्या प्रस्तावाचा सर्वसाधारण तपशिल :-**

| **अ.क्र.** | **अपचाऱ्याचे नाव व सेवानिवृत्तीचा दिनांक** | **पदनाम व वेतनश्रेणी ज्ञापन बजावितेवेळी असलेले** | **सध्याचे पदनाम व वेतनश्रेणी (सेवानिवृत्त असल्यास तसे नमूद करावे.)** | **शिक्षा** | **शिक्षेच्या अंमलबजावणीस पुरेसा कालावधी शिल्लक आहे किंवा कसे (सेवारत अपचारी)** | **शिक्षेमध्ये आर्थिक वसुलीचा समावेश असल्यास वसुलीबाबतचे विवेचन (सेवा उपदान, रजा रोखीकरण, इ.) (सेवानिवृत्त अपचारी)** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |

* एकापेक्षा अधिक कर्मचारी असल्यास पद ज्येष्ठतेप्रमाणे अपचारीनिहाय तपशील द्यावा.

४. वरील पार्श्वभूमीच्या अनुषंगाने श्री. ...................., पदनाम , श्री. ............................ पदनाम व श्री. .................. पदनाम यांच्या वरील परि.३ मध्ये नमूद शिक्षेच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठवावयाच्या पृ. /प.वि. वरील पत्राच्या प्रारुपास सहमती देण्याची विनंती सामान्य प्रशासन विभागास करण्यात येत आहे.

**क.अ. / अ.स.**
**उ.स. /स.स.**
**अ.मु.स./ प्र.स./स.**
**अ.मु.स.(सेवा) सा.प्र.वि.**

***********